# वार्ता टिपण दि.०३/०५/२०१७

## (एकुण २ पिस्तोल व ६ काडतुसासह सराईत गुन्हेगार प्रॉपर्टी सेल कडून जेरबंद )

दि.०२/०५/२०१७ रोजी,प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.एस व्हि शिंदे हे त्यांचे स्टाफसह कार्यालयात हजर असताना पो हवा जितेंद्र तुपे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली वनदेव नगर थेरगांव पुणे येथे राहणारा सागर गवसणे याचे कडे पिस्टल असुन तो पिस्टल घेऊन रामकृष्ण मोरे सभागृह चिंचवड येथे दुपारी ३.०० वाजता येणार आहे. सागर गवसणे हा रंगाने गोरा अंगाने मध्यम अंगात राखाडी रंगाचा हाफ टी शर्ट व काळी पॅट तो सरळ बाजूस भांग पाडतो.अशी बातमी मिळाल्याने ते,स्वत:तसेच पो.हवा.संजय जगताप,पो.हवा.सुभाष कुंभार पो.हवा. सिध्दराम कोळी पो ना दिनकर भुजबळ असे प्रॉपर्टी सेल कार्यालयात हजर असताना १३.०० वा सदर बाबत कार्यालयात हजर असलेले पो नि श्री सतीश शिंदे प्रापर्टी सेल गुन्हे शाखा यांना कळविली असता त्यांनी लागलीच वरील सर्व स्टाफला त्यांचे समक्ष बोलावून घेऊन मिळाले बातमी प्रमाणे खात्री करुन कारवाई करा असा आदेश दिला.

सदर ठिकाणी वर नमूद पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन इसम नामे सागर सुभाष गवसणे वय ३२ रा. वनदेव नगर थेरगांव पुणे यास पकडुन त्याचेकडुन दोन गावठी पिस्तोल व सहा जिवंत काडतुसे असा कि.रु. ७१,५००/- चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरुध्द चिचवड पोलीस ठाणे पुणे शहर येथे गु.र.नं. ११७/२०१७ आर्म अॅक्ट क.३ सह २५ व मुंबई पोलीस कायदा क.३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून,त्यामध्ये त्यास दि.०२/०५/१७ रोजी अटक केली आहे.

सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त मा.श्री. प्रदिप देशपांडे सो. पोलीस उपायुक्त मा.श्री.पी.आर.पाटील सो.सहा.पोलीस आयुक्त मा.श्री.सुरेश भोसले सो. यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे प्रॉपर्टी सेल पो.निरी.एस.व्हि.शिंदे पोलीस कर्मचारी पो.हवा. जितेंद्र तुपे,संजय जगताप,सुभाष कुंभार,सिध्दराम कोळी, दिनेश भुजबळ,संभाजी गायकवाड,अमोल भोसले यांनी केली आहे.